**नि.फौ.ख.क्र.६०९/२०२३**
शासन–वि–तानाजी.
**नि.क्र.४५.**

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. ६ यांची जबानी**

मी याद्वारे सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की,
नाव – स्वप्नील सुरेश लोखंडे,
वय – ३९ वर्षे, व्यवसाय – पोलीस निरीक्षक,
राहणार– सशस्त्र पोलीस नायगाव, मुंबई शहर.

**सरतपासणी अभियोग पक्षातर्फे विद्वान सहा. सरकारी अभियोक्ता श्रीमती. के. बी. भोसले यांच्यामार्फत शपथेवर सुरुः–**

१. मी दि. ०२.०३.२०२३ रोजी यवत पोलीस स्टेशन येथे सहाय्यक पोलीस निरीक्षक म्हणून नेमणूकीस होतो. सदर दिवशी केडगाव दुरक्षेत्र येथे माझी नेमणूक होती. सदर दिवशी अकस्मात खबर क्र. ८७/२०२३ माझ्याकडे आली होती. सदरची खबर सोनाली विठ्ठल झगडे नामे महिला घेऊन आली होती. सदरची खबर तानाजी राजाराम शिंदे यांच्याविरुध्द देण्यात आली होती. सदर महिलेचे असे कथन होते की, तिच्या पतीने ती हर्ष हॉस्पीटल येथे कार्यरत असतेवेळी पोटगीच्या केसेस मागे घेण्याच्या कारणावरुन तिला फायबरच्या काठीने डोक्यावर, हातावर आणि पायावर मारहाण केली होती. त्या महिलेच्या सांगण्यानुसार मी नोंदवून घेतली होती. सदरची घटना दि. २६.०२.२०२३ रोजी घडल्याचे तिने कथन केले होते. सदरची खबर मी स्वतः नोंदवून घेतली होती. आता मला दाखविण्यात आलेला नि. ३७ वरील ऑकरन्स रिपोर्ट तोच आहे. त्यावर माझी आणि तक्रारदार हिची सही आहे. त्यातील मजकूर तक्रारदार महिलेने सांगितल्यानुसार नमूद केलेला होता. सदरचा ऑकरन्स रिपोर्ट आणि फिर्यादी जबाब नोंदविल्यानंतर यवत पोलीस स्टेशन येथे रजिस्टर करण्यासाठी पाठविले. आता मला दाखविण्यात आलेला नि. २१ वरील फिर्यादी जबाबावर माझी आणि तक्रारदार हिची सही आहे. त्यातील मजकूर तक्रारदार महिलेने सांगितल्यानुसार नमूद केलेला होता.

**सरतपास पुर्ण.**

**उलटतपास आरोपीतर्फे विद्वान विधीज्ञ श्री. पी. बी. गिरमकर यांच्यामार्फतः–**

२. मी केडगाव चौकीत एक वर्ष काम पाहिले होते. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादीने तक्रार देतेवेळी यापूर्वी झालेल्या पोटगीच्या केसेसबाबतचे कागदपत्र दिले नाही. हे म्हणणे खरे आहे की, तिला मारहाण झाल्याबाबतचे वैद्यकीय प्रमाणपत्र दिलेले नव्हते. ऑकरन्स आणि जबाब नोंदविल्यानंतर ते कागदपत्र प्रत्यक्षात यवत पोलीस स्टेशन येथे पाठविण्यात येते. हे म्हणणे खरे आहे की, सदर केसमध्ये मी फक्त ऑकरन्स आणि जबाब नोंदविलेला आहे. कोणताही तपासकाम केलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, मला

घटनेबाबत काहीही माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासातील मजकूर खोटा आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्विकृत.

समक्ष

Sd/–

**[ श्रीमती एस. ए. विराणी ]**

दिनांकः– ०७.०३.२०२६

न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, दौंड, जि. पुणे.